जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३९१ दिनांक - २१/०९/२०२४**

येरवडा पोलीस ठाणे पुणे शहर

**एन.के गँगचा म्होरक्या -निखील ऊर्फ निक्या मधुकर कांबळे(टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई**

दिनांक २४/०८/२०२४ रोजी लक्ष्मीनगर येरवडा पुणे याठिकाणी यातील फिर्यादी यांचे पोटाला पिस्तुला सारखी वस्तु लावुन धमकी देवुन फिर्यादी यांचे गळयातील ९,०००/- रू.किं.ची सोन्याची चैन व हातातील १६,०००/-रू.कि.ची सोन्याची अंगठी असे बळजबरीने काढुन घेवुन चोरून नेली म्हणुन आरोपी नामे १) सुदेश गायकवाड रा.नेताजी शाळेजवळ सुभाषनगर येरवडा पुणे २) निखील कांबळे रा.लक्ष्मीनगर येरवडा पुणे व त्याचे इतर २ अनोळखी साथीदार यांचे विरुध्द फिर्यादी यांनी दिले तक्रारी वरुन येरवडा पोलीस ठाणे गु.र.नं.५४५/२०२४ भा.न्या.संहित कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान यातील आरोपी १) **निखील ऊर्फ निक्या मधुकर कांबळे वय २१ वर्षे रा.लक्ष्मीनगर येरवडा पुणे (टोळी प्रमुख ) व २) सुदेश रुपेश गायकवाड वय २२ रा.नेताजी शाळेजवळ सुभाषनगर येरवडा पुणे ३) अतिब उर्फे बांडा अखिल सैय्यद वय १९ वर्षे रा.लक्ष्मीनगर येरवडा पुणे** टोळीसदस्य यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन एक पाहिजे आरो़पी यांचा शोध सुरु आहे.

सदर आरोपी निखील ऊर्फ निक्या मधुकर कांबळे वय २१ वर्षे हा वेगवेगळया टोळी सदस्यांचे मदतीने **वारंवार खुनाचे प्रयत्न करणे, जबर दुखापती करणे, शिवीगाळ करणे, सार्वजनिक शांततेच्या विरोधी अपराध-प्राणघातक हत्यारांसहीत बेकायदेशीर जमाव जमवणे,दंगाकरणे,दहशत माजवणे,जिवे मारण्याची धमकी देणे,चोरी करणे** असे गंभीर गुन्हे केलेले आहेत. निखील ऊर्फ निक्या मधुकर कांबळे वय २१ वर्षे हा येरवडा स्थित एन.के गॅग या टोळीचा प्रमुख असून, त्याने आपले वेगवेगळ्या साथीदारांसह गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याने व टोळीसदस्य याचे मदतीने येरवडा,विश्रांतवाडी,विमानतळ, कोरेगाव पार्क परीसरात दहशत निर्माण करून, स्वतःसाठी व इतरांसाठी आर्थिक फायदा मिळविण्याचे उद्देशाने तसेच परिसरात त्यांचे टोळीचे वर्चस्व वाढवण्यासाठी हिंसाचाराचा वापर करुन,तसेच गाड्यांची तोडफोड करुन नागरीकांच्या मनात भिती निर्माण करुन वरील प्रमाणे गंभीर गुन्हे केलेले आहेत. त्याने त्यांची टोळी (संघटना) वाढविण्याचे प्रयत्न कायम चालू ठेवलेले आहेत.

वरील गंभीर गुन्हे करण्यासाठी **टोळी प्रमुख- निखील ऊर्फ निक्या मधुकर कांबळे वय २१ वर्षे** याने आजूबाजूच्या परिसरातील गरीब, असहाय्य युवकांना जमवून त्यांना पैशाचे व इतर आमीष दाखवून त्यांना वेगवेगळ्या गुन्ह्यामध्ये त्याचे साथीदार बनवून त्यांचे करवी गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे, दहशतीचे मार्गाने, बेकायदेशिरपणे स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी सदरचा गुन्हा केल्याचे स्पष्टपणे दिसुन आल्याने,तसेचत्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ च कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी पोलीस ठाणे चे निगराणी पथकाचे अधिकारी/ पोलीस उपनिरीक्षक महेश फटांगरे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रदिप सुर्वे व अधिनस्त पथक यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रविद्र शेळके, येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ०४ पुणे शहर श्री. हिंमत जाधव यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.मनोज पाटील यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.५४५/२०२४ भा.न्या.संहित कलम ३०९(४),३(५) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर, श्री.मनोज पाटील यांनी पुर्व मान्यता दिलेली आहे. नमुद गुन्हयांच्या कलमांत मकोका कायद्याप्रमाणे कलम वाढ करण्यात आली आहे.

**सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्रीमती प्राजंली सोनवणे ह्या करीत आहेत.**

सदरची उल्लेखनीय कामगिरी **मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे श्री.रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि-०४ श्री.हिंमत जाधव, मा.सहा पोलीस आयुक्त श्रीमती प्राजंली सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र शेळके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती पल्लवी मेहेर, निगराणी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक महेश फटांगरे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रदिप सुर्वे,पोलीस अंमलदार सचिन माळी, सचिन शिंदे, महीला पोलीस अंमलदार मोनिका पवार यांनी केली आहे.**